# मुंबई पोस्टल एम्प्लॉईज को ऑप. क्रेडिट सोसायटी लि.

तळमजला, मुंबई जी.पी ओ. इमारत, मुंबई -४००००१. रजि. नं. ७२२
फोन. नं. ०२२-२२६२०४१३ / २२६९४१७२ इमेल : mumbaipostsociety@gmail.com

## १०८ वी वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

मुंबई पोस्टल एम्प्लॉईज को. ऑप. क्रेडीट सोसायटी लि. या संस्थेची १०८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा सोमवार दि.११ ऑगस्ट २०२५ रोजी सायंकाळी ठिक ६.०० वाजता प्राचार्य बी. एन. वैद्य सभागृह, राजा शिवाजी विदयासंकुल, एल. एन. रोड, दादर (पूर्व), मुंबई-४०००१४ येथे संपन्न होणार आहे.

सोसायटीच्या सर्व सभासदांनी ठिक वेळेवर उपस्थित रहावे अशी अगत्यपुर्वक विनंती आहे.

**---- सभेपुढील विषय ----**

१. दि.०४.०९.२०२४ रोजी झालेल्या १०७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त मंजूर करणे.

२. दि.३१ मार्च २०२५ अखेरचा संचालक मंडळाचा अहवाल तसेच वैधानिक लेखा परिक्षकांनी तपासलेले ताळेबंद पत्रक नफा -तोटा पत्रक व नफा- तोटा विनियोजन लेखा स्विकारणे आणि त्यास मंजूरी देणे.

३. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या सन २०२४-२०२५ च्या नफा वाटपास मंजूरी देणे.

४. सन २०२५-२०२६ च्या अंदाज पत्रकाला मंजूरी देणे.

५. सन २०२५-२०२६ करीता वैधानिक लेखा परिक्षक यांची निवड करणे.

६. संचालक मंडळाने सुचविलेल्या ठरावांचा व उपविधीतील दुरूस्त्यांचा विचार करणे व मंजुरी देणे.

७. सन २०२३-२४ च्या दोष दुरूस्ती अहवालास मंजूरी देणे.

८. संस्थेच्या मळवली येथील विश्राम गृहाच्या इमारतीचे नूतनीकरण्याच्या खर्चाला मंजूरी देणे.

९. वार्षिक सर्वसाधारण सभेला अनुपस्थित असलेल्या सभासदांना क्षमापित करणे बाबत.

१०. अध्यक्षांच्या परवानगीने येणाऱ्या इतर विषयांवर चर्चा करणे.

मुंबई
दि: २७ जून२०२५

**राजेश पी.सारंग**
**मानद सचिव**
संचालक मंडळाच्या वतीने

**: सभेसंबंधी विशेष सूचना :**

१) सभेच्या नियोजित वेळेत गणपूर्ती न झाल्यास सभा स्थगित केली जाईल व अशी स्थगित झालेली सभा त्याच ठिकाणी त्याच दिवशी वरील कामकाज करण्यासाठी ठिक ६.३० वाजता घेण्यात येईल.

२) वार्षिक सर्वसाधारण सभेत अहवालासंबंधी कोणाला प्रश्न विचारावयाचे असतील त्यांनी आपले प्रश्न सर्वसाधारण सभेच्या पुरे सात दिवस अगोदर लेखी स्वरुपात द्यावेत.

३) सभासदांना विनंती करण्यात येते कि,सभेला उपस्थित रहाताना सोसायटीचे पासबुक आणणे आवश्यक आहे.

४) क्रियाशील सभासदांना वार्षिक सर्वसाधारण सभेच्या कामकाजात भाग घेता येईल व अक्रियाशील सभासदांना वार्षिक सर्वसाधारण सभेच्या कामकाजात भाग घेता येणार नाही.

पोस्ट खात्यामार्फत स्पीड पोस्टच्या दरामध्ये दि.०१.१०.२०२५ पासून वाढ करण्यात आली असून त्याबाबतचे दरपत्रक सोबत जोडले आहे. त्यामुळे सोसायटीच्या सभासदांना पुरविण्यात येणा-या स्पीड पोस्टचे सुधारीत दर खालील प्रमाणे असतील.

१.मुंबई स्पीड पोस्ट करीता — रु.२३.००
२.मुंबई बाहेरील स्पीड पोस्ट करीता — रु.५६.००

१. मुंबईतील सभासदांना हमी निधी कर्ज अर्ज स्पीड पोस्टव्दारे पाठविण्याकरीता रु.५७३.००(रु. पाचशे त्र्याहत्तर मात्र) आणि बचतफंड कर्ज अर्ज स्पीड पोस्टाव्दारे पाठविण्याकरीता रु.३५.०० (रु.पस्तीस मात्र) इतकी रक्कम आकारण्यात येईल.

२. मुंबई बाहेरील सभासदांना हमी निधी कर्ज अर्ज स्पीड पोस्टाव्दारे पाठविण्याकरीता रु.६०४.०० (रु.सहाशे चार मात्र) इतकी रक्कम व बचतफंड कर्ज अर्ज स्पीड पोस्टाव्दारे पाठविण्याकरीता रु.६८.०० (रु.अडुसष्ट मात्र) इतकी रक्कम आकारण्यात येईल.

मळवली विश्रामगृह नूतनीकरणाच्या कामामुळे विश्रामगृह आरक्षण तूर्तास बंद ठेवण्यात आलेले आहे तसदीबद्दल क्षमस्व.